# शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद

**Government Polytechnic, Tuljapur, Road,**

**Osmanabad – 413 501 (Maharashtra**

E-mail principal.gposmanabad@dtemaharashtra.gov.in , osd_gpobad@rediffmail.co

जा.क्र.शातंनिउ/आस्था-२/२०१८/2775

दिनांक :- 14 NOV 2018

## जाहीर निविदा

शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद या संस्थेसाठी सुरक्षारक्षक (पहारेकरी)-०७, सफाईकामगार-०२, लोहार-०१, प्लंबर कम पत्राकारागीर-०१, विदयुत मिस्त्री-०१, माळी -०१ या पदासाठी कंत्राटी पध्दतीने सेवा घेण्यात येत आहेत. या सेवा कंत्राटी पध्दतीने पुरविणा-या इच्छूक नोंदणीकृत संस्थेकडून **दोन लिफाफा पध्दतीने** मोहोरबंद लिफाफयात निविदा मागविण्यांत येत आहेत. सदर सेवा पूरविण्यासाठी सुरक्षारक्षकाविषयी आवश्यक परवाना, अनुभव व गुणवता तसेच नियमानुसार दर या निकर्षावर नोंदणीकृत संस्थेची निवड करण्यांत येईल. निविदा शुल्क रु.२०००/- (दोन हजार रुपये) भरुन कोरा निविदा अर्ज या कार्यालयातून दिं.१४/११/२०१८ पासून ते दिं.30/११/२०१८ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत प्राप्त करण्यात याव्या. तसेच निविदा भरणे संबधी च्या सर्व अटी व नियम या संस्थेच्या संकेतस्थळावर **www.gposmanabad.org** उपलब्ध आहेत.

(डॉ.एन.एस.लिंगायत)
प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन,उस्मानाबाद.

# निविदा भरणे करीता सर्व साधारण अटी व शर्ती.(१)

१) कंत्राटदाराने निविदा अर्ज **दोन लिफाफा पध्दतीने** (तांत्रिक व वाणिज्यिक लिफाफा) मोहोरबंद लिफाफयात सादर करावेत. तसेच ज्या निविदा/ दरपत्रके तांत्रिक छाननीमध्ये पात्र ठरतील त्यांच्याच वाणिज्यिक निविदा उघडण्यात येतील याची नोंद घ्यावी.

२) **त्यापैकी एका लिफाफयात** (तांत्रिक लिफाफा) कंत्राटदाराने त्यांच्या कंपनीचे / संस्थेचे नोंदणी प्रमाण पत्र, सुरक्षा विषयक पसारा परवाना, सेवा कराचे प्रमाणपत्र, मागील ३ वर्षाचे आयकर प्रमाणपत्र (२०१५-१६,२०१६-१७ व २०१७-१८), जी.एस.टी. क्रमाक, पॅनकार्ड, ई.एस.आय.सी. प्रमाणपत्र, पी.एफ. प्रमाणपत्र, प्रोफेशनल टॅक्स प्रमाणपत्र तसेच संबधीत कंपनीचे / संस्थेचे बॅंक अॅकाऊंट पासबुकाची पहील्या पानाची या सर्व प्रमाणपत्रांचा कालावधी वैध असल्याचे छायांकीत प्रत सादर करणे बंधनकारक आहे. कंत्राटदाराने सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास निविदा अर्ज निविदा प्रक्रीयेतून बाद ठरविण्यात येईल.

३) **व दुसरा लिफाफयात** (वाणिज्यिक लिफाफा) कंत्राटदाराने निविदा अर्ज सादर करावे ज्यामध्ये मानधनाचे नियमानुसार कमीत कमी दर असावेत.

४) नेमणूक करावयाच्या पदाकरीता कामगारांचा किमान ३ वर्ष इतरत्र पुरवठा केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य दिल्या जाईल.

५) संस्थेकडून पदनिहाय प्रति माह व प्रति दिन किती मानधन अपेक्षित आहे. याचे दर उपलब्ध प्रचलित किमान वेतन संबंधित कायद्याच्या तरतुदीत अधीन राहून व पालन करून निविदेत स्पष्टपणे लिहिणे बंधनकारक आहे. प्रति माह व प्रति दिन असे दोन्ही दर देणे आवश्यक राहील. तसेच ज्या निविदेत दर्शविलेली रक्कम कमीत कमी असेल ती मंजूर केली जाईल. दिलेल्या मानधनाच्या दरात शासनाच्या विविध कायद्याअंतर्गत कायद्यातील आवश्यक त्या सर्व तरतुदीचे पालन करण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

६) त्यानुसार कामगाराचा अपघात व वैदयकीय विमा, इतर उपचार, भविष्य निर्वाह निधी ची किमान रक्कम याचा मानधनाच्या दरात समावेश असणे व बिलात त्याचा स्पष्ट उल्लेख असणे बंधनकारक असेल. तसेच त्या सर्व कामगाराच्या नावे भरलेली रंक्कमेची पावती ची छायांकीत प्रत त्याच महीन्यात या कार्यालयाला सादर करावी लागेल.

७) निविदा भरते वेळी प्रति अर्ज रू.५०००/- अनामत रक्कम प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद यांच्या नावे स्टेट बॅंक ऑफ इंडीया शाखा उस्मानाबाद येथे देय असलेला (Payble at Osmanabad) एस.बी.आय. धनाकर्ष (Demand Draft) जमा करावा लागेल. निविदा मंजूर न झाल्यास तो धनाकर्ष (Demand Draft) परत केला जाईल. तथापी निविदा मंजूर होऊनही पदाकरीताचे पात्र उमेदवार पुरवठा न केल्यास सदर अनामत रक्कम धनाकर्ष (Demand Draft) शासन जमा केली जाईल.

८) कोरे निविदा अर्ज रू.२०००/- प्रती अर्ज शुल्क संस्थेच्या रोखापाल कडे जमा करून हस्तगत करावे व ती रक्कम ना परतावा असेल.

९) मानधनाचे कमीत कमी दर व दर्शविलेले दरपत्रक, अटी व शर्ती मान्य असल्याचे व रू.५०० स्टॅंम्प पेपर वरती स्वखर्चाने नोंदणीकृत करारपत्रावर स्वाक्षरी करणेची तयारी असलेले नमुद करून **दोन लिफाफा पध्दतीने मोहोरबंद लिफाफयात** प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद. पिन कोड ४१३५०१ यांचे नावे व पत्यावर दिं.30/11/ २०१८ रोजी सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयाच्या निविदा बॉक्स मध्ये कार्यालयीन अधिकारी अथवा कर्मचारी यांचे समक्ष टाकावे .

१०) कंत्राटदारांनी सुरक्षारक्षक, सफाईकामगार, लोहार, प्लंबर कम पत्राकारागीर व विदयुत मिस्त्री या पदांच्या कामाकरिता कर्मचाऱ्यांचा पुरवठा करावयाचा आहे. यापुरवठयाचा कालावधी कार्यालयीन आदेशाच्या दिनाकांपासुन पुढे ११ महिनेपर्यंत इतकाच लागू राहील. तसेचपुरवठा कालावधीत कंत्राटदाराकडून सेवेविषयक गंभीर बाबी,गुन्हा तक्रारी निर्दशनास आढळून आल्यास सदर दिलेले कंत्राट तात्काळ रद्द् करण्यात येईल.

११) कंत्राटदाराने त्याच्या कामगारांना अदा करावयाची वेतनाची रक्कम ही किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार व कामगार कार्यालयाने वेळोवेळी केलेल्या सुचनेनुसार असावी व त्या नुसार निविदा भरण्यात यावी.

१२) पुरवठा करणा-या सर्व कर्मचा-यांच्या एक महिन्याच्या मानधना इतकी रक्कम संस्थेकडे दोन वर्ष कालावधीसाठी सुरक्षाठेव म्हणून जमा करावी लागेल. होणा-या नुकसानीच्या रक्कमेची भरपाई परस्पर सुरक्षाठेव रक्कमेतून करुन घेण्यांत येईल. व उर्वरीत परत केले जाईल.

१३) वित्त विभाग शासन परिपत्रक, क्र.पदनि-२०१०/८४/१०/विसु-१ दि.२७/०९/२०१०.
वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११/१३/विसु-१ दि.२.२.२०१३.
विधी व वित्त विभाग शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/ प्र.क्र.११२/१३/विसु-१ दि.०२/१२/२०१३.
विधी व न्याय विभाग शासन निर्णय क्र. पदनि२५१२/ प्र.क्र.१५७/ का१२, दि.२७.०१.२०१५.
वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-२०१६/ प्र.क्र.२९/१६/वित्तिय-१ दि.०२/०८/२०१६.
नुसार कंत्राटी सेवा घेण्याची कार्यवाही पुर्ण करण्यांत येईल.

कंत्राटी पध्दतीने निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात लेबर कंत्राटदार मार्फत भरायची पदे खालीलप्रमाणे.

| अ.क्र. | पदाचे नाव व संख्या | किमान अर्हता | किमान अनुभव | वयाची अट |
|---|---|---|---|---|
| ०१ | सुरक्षारक्षक / पहारेकरी - ०७ | १० वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण | १ वर्षे शासन सेवेचा/ मान्यता प्राप्त संस्थेचा/ कारखान्यातील. (माजी सैनिकास प्राधान्य) | १८ते३५ वर्षे |
| ०२ | सफाई कामगार– ०१ (ओला / कोरडा) | ७/८ वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण | १ वर्षे | १८ते३५ वर्षे |
| ०३ | माळी – ०१ | १० वी उत्तीर्ण/अनुत्तीर्ण | १ वर्षे | १८ते३५ वर्षे |
| ०४ | लोहार – ०१ | शासनमान्य संबधित ट्रेड मधील आयटी आय उत्तीर्ण | ३ वर्षे शासन सेवेचा/ मान्यता प्राप्त संस्थेचा/ कारखान्यातील. | १८ते३५ वर्षे |
| ०५ | प्लंबर कम पत्राकारागीर– ०१ | शासनमान्य संबधित ट्रेड मधील आयटी आय उत्तीर्ण | ३ वर्षे शासन सेवेचा/ मान्यता प्राप्त संस्थेचा/ कारखान्यातील. | १८ते३५ वर्षे |
| ०६ | विदयुत मिस्त्री– ०१ | शासनमान्य संबधित ट्रेड मधील आयटी आय उत्तीर्ण | ३ वर्षे शासन सेवेचा/ मान्यता प्राप्त संस्थेचा/ कारखान्यातील. | १८ते३५ वर्षे |

१४) पुरवठा आदेश हे वरीष्ठ कार्यालयाच्या मंजूरीच्या अधीन राहून देण्यात येतील तसेच वरील सर्व पदे व पदाच्या संख्येत बदल (कमी /जास्त) होऊ शकेल याबाबतचे व निविदा स्विकारणे अथवा मंजूर करणे तथा रद्द् करण्याचे सर्वस्वी अधिकार प्राचार्यांना राहतील. तसेच शासन नियमानुसार मागासवर्गीयांना व माजी सैनिकांना वयाची अट शिथील करणेत येईल

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद.

अटी व शर्ती :- .(२)

१. कंत्राटदारांनी कर्मशाळा तांत्रिक कर्मचारी या पदांच्या कामाकरिता कर्मचाऱ्यांचा पुरवठा करावयाचा आहे. या पुरवठयाचा कालावधी कार्यालयीन आदेशाच्या दिनाकांपासुन/पुरवठयाच्या तारखेपासुन पुढे ११ महिनेपर्यंत

२. अ) नेमणुका केवळ कंत्राटी पध्दतीवर व प्रतिमहा कमीत कमी मानधन सादर केलेल्या कंत्राटदारास वरिष्ठ कार्यालयांच्या मंजूरीस अधिन राहून केल्या जातील.

ब) माहितीचा अधिकार नियम २००५ कंत्राटदारास देखिल शासकीय कर्मचा-यांइतकाच लागू राहील.

३. कर्मशाळा विभागाकरीता लागणा-या व कंत्राटामार्फत पुरविल्या जाणा-या तां.कर्मचा-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, कौशल्य व इतर आवश्यक बाबींची पडताळणी, चाचणी कर्मशाळा अधिका-यामार्फत करुन घेतल्यानंतर त्याच्या शिफारशीनुसार कर्मचा-यांची अंतिम निवड केले जाईल. सर्व कर्मचा-यांचा पुरवठा करणे ही जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची राहील. अन्यथा नियमानुसार कार्यवाही करण्यांत येईल. याकरीता त्या त्या पदाचा चाचणी परिक्षेकरीता इच्छूक उमेदवारास त्या त्या दिवशी हजर करण्यांची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

४. विविध शाखेच्या त्या त्या विषयाच्या अभ्यासक्रमाचा वेळापत्रकानुसार प्रात्यक्षिक विद्यार्थ्यांकडून कर्मशाळा अधिक्षकांच्या नियंत्रणाखाली पूर्ण करुन घ्यावे लागतील. संस्थेतील वस्तू निर्मिती व दुरुस्त्यांची/ संबंधित कामे करावी लागतील.

५. प्रात्यक्षिकांच्या / थेअरीच्या अनुषंगाने आवश्यक असलेली व वरिष्ठांनी सांगितलेली वेळोवेळीची कामे करावी लागतील

६. प्रात्यक्षिकांकरीता भांडारपालाकडून वेळोवेळी ताब्यात घेतलेली उपकरणे / मशिन्स / हत्यारे /कच्चा माल / खर्च शिल्लकीच्या नोंदी करणे त्यांची सुरक्षितता व भांडारपालास परत करण्यांची जबाबदारी त्या त्या तांत्रिक कर्मचारी व कंत्राटदार यांची राहील.

अ) मंजूर निविदेतील आवश्यकेतनुसार पदाकरिताच्या कर्मचाऱ्याच बोलावले जाईल. कोणत्या पदाकरीता बोलावले जाईल, याबाबतचे अधिकार प्राचार्यांस राहतील.

७. पुरविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे एकत्रित वेतनावर पुर्ण आवश्यकतेनुसार कपात करूनच मानधन कंत्राटदारांस धनादेशाद्वारे अदा केले जाईल. संबधित कर्मचाऱ्यास मानधन अदा केले जाणार नाही.

८. एकत्रित मानधनाची रक्कम ही दर महिन्यास महिना पुर्ण झाल्यानंतर कंत्राटदारांकडून देयक प्राप्त झाल्यावर देयक कोषागारात सादर करून कोषागार कार्यालयाकडुन धनादेश प्राप्त झाल्यानंतरच अदा करण्यांत येईल. या रक्कमेपोटी कोणतेही अग्रिम अनुज्ञेय असणार नाही. व प्रदानाला उशिर झाल्यास कोणतेही व्याज देय राहणार नाही. तसेच कर्माचाऱ्यांना अनुपस्थितीत दिवसाचे वेतन मंजूर दरानुसार कपात करण्यात येईल.

९. कंत्राटी पध्दतीने नियुक्त कर्मचाऱ्यांना नियमीत शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे कोणतेही फायदे देय नाहीत. तसेच त्यांना कामावर रुजू होतांना अथवा कामावरुन मुक्त होतांना कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

१०. नेमणुक करण्यात येणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांचा बायोडाटा प्राचार्यांना सादर करणे हे कंत्राटदारांवर बंधनकारक असेल. दर महिन्याच्या एक तारखेला कंत्राटदार हे त्यांच्या मार्फत नेमनेल्या कर्मचा-याच्या नांवाची यादी प्राचार्यांना सादर करतील. गैरहजर कर्मचा-यांच्या जागी आगाऊ पर्यायी व्यवस्था पात्र व योग्य कर्मचारी देवून करावी लागेल.

११. एखादया कर्मचा-याचे काम समाधानकारक नसल्यास प्राचार्याच्या सुचनेनुसार कंत्राटदाराने त्यांच्या ऐवजी दुसरा योग्य कर्मचारी लवकरात लवकर पुरविणे आवश्यक आहे. न केल्यास मानधनाच्या दुप्पट दंड आकारुन सुरक्षाठेव मधून कपात केला जाईल.

१२. कर्मचा-यांच्या कामाचा कालावधी हा किमान आठ तासाचा राहील. संस्थेच्या गरजेनुसार कामाच्या वेळेमध्ये बदल करण्याचे अधिकार प्राचार्याना राहील. सुटीच्या दिवशी देखील आवश्यकतेनुसार हजर राहावे लागेल. त्याचा वेगळा मोबदला देय्य नाही.

१३. कर्मचारी कामावर असतांना त्यांच्या जिवीतास कांही हानी/नुकसान झाल्यास त्याची सर्व जबाबदारी कंत्राटदाराची राहील. संस्थेस कोणत्याही प्रकारचे नुकसान झाल्यास त्याची भरपाई देण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची राहील. कर्मचा-याचा आयुर्विमा उतरवल्याचा पुरावा सादर केल्याशिवाय मानधन अदा केले जाणार नाही.

१४. कंत्राटी पध्दतीने पुरविण्यांत येणारे कर्मचारी प्रामाणिक व विश्वासू असल्याची खात्री कंत्राटदाराने करुन अशाच कर्मचा-यांची नेमणुक करणे आवश्यक राहील. त्यांची पोलीसाकडून पडताळणी अहवाल कंत्राटदारास दयावा लागेल व संस्थेस सादर करावा लागेल.

१५. अनु.क्र.१ मधील नमुद कालावधीमध्ये कंत्राट पध्दतीवरील नेमणुकीबाबत शासनाने वेगळे कांही धोरण ठरवल्यास आवश्यक असल्यास नियुक्तीचा कालावधी पुर्वी संपुष्ठात आणण्याचे अधिकार प्राचार्यांना राहतील. त्यासाठी कोणतीही पुर्वसुचना देणे आवश्यक असणार नाही.

१६. कंत्राटी कर्मचारी नियुक्ती बाबत केंद्र / राज्य शासनाच्या कायदे अथवा नियमांचे उल्लंघन होणार नाही यांची दक्षता घेण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

प्राचार्य,
शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद.